२ ६५१५ / १४

पहा :- १. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१६६/२/कोशा(प्रशा-३), दि. ०२.१२.२००८

२. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/कोषा(प्र.३) दि. ३१.१२.२००८

३. शासन निर्णय वित्त विभाग क्र.सेवाप्र-११.०७/प्र.क्र.१९६/कोषा(प्र.३), दि. ०२.०३.२००९

---

लेखापरीक्षा लिपिक, कनिष्ठ लेखापरीक्षक व वरिष्ठ लेखापरीक्षक पदांच्या नियुक्तीबाबत प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी करावयाची कार्यवाही.

संचालनालय, स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य, कोकणभवन, नवी मुंबई
परिपत्रक क्र.स्था.१८/ब/सअ४/२८ दिनांक ११/१/२०१०

## परिपत्रक

प्रस्तावना-

स्थानिक निधी लेखा संचालनालयासह त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील गट-क संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये एक वाक्यता आणण्यासाठी स्थानिक निधी लेखा गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८ असे नवीन सेवा प्रवेश नियम उपरोक्त प्रस्तावनेतील नमुद शासन अधिसूचना व निर्णय याद्वारे अस्तित्वात आलेले आहेत. तसेच जुन्या व नव्या संवर्गातील कर्मचारी यांच्या मध्ये सेवाविषयक अडचणी निर्माण होवू नयेत म्हणून काही तरतूदीसुध्दा विहीत करण्यात आल्या आहेत. अधिसूचना व शासन निर्णयातील तरतुदी सुस्पष्ट आहेत असे असले तरी, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी या नवीन संवर्गाच्या अनुषंगाने कोणती कर्तव्ये / जबाबदाऱ्या पार पाडणे आवश्यक आहे. याबाबत संभ्रम निर्माण होवू नये या हेतूने संचालनालयातील व संचालनालयाच्या नियंत्रणाखालील सर्व संबंधितांना पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

शासन अधिसूचना दि.०२.१२.२००८ अन्वये स्थानिक निधी लेखा सेवा (सेवा प्रवेश) नियम २००८ प्रसारीत झालेले आहेत. शासन निर्णय वित्त विभाग दि. ०२.०३.२००९ अन्वये लेखापरीक्षा लिपिक, कनिष्ठ लेखापरीक्षक व वरिष्ठ लेखापरीक्षक पदांसाठी सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांना नियुक्ती प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेवर परिणामकारक प्रशासकीय नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी खालील कामे/ जबाबदाऱ्या पार पाडणे क्रमप्राप्त आहे.

१. नियुक्त्या, बदल्या/ पदस्थापना व पदोन्नत्या (कालबध्द पदोन्नत्यांसह)

२. सेवाज्येष्ठता, मानीव दिनांक, बिंदु नामावली ठेवणे.

३. विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरणे

४. अन्य प्रशासनीक व आस्थापना विषयक बाबी